अँग्लो-फ्रेंच टेक्सटाईल कंपनी लिमिटेड.

विरुद्ध

आयकर आयुक्त, मद्रास.

[मेहर चंद महाजन, दास, विवियन बोस आणि भगवती जे.]

भारतीय प्राप्तीकर कायदा (१९२२ चा ११ वा), कलम ४२[१] , ४२[३] — अनिवासी-स्थापित एजन्सीद्वारे भारतामध्ये सामग्रीची खरेदी-तो ' व्यवसाय करणे होतो काय - खरेदीच्या व्यवहारातून मिळणारा नफा भारतात कर आकारणीस पात्र ठरतो - 'व्यावसायिक सबंध' याचा अर्थ

भारताबाहेर उत्पादनाचा व्यवसाय करणाऱ्याने जरी भारतात कच्च्या धातूच्या खरेदीचे काही आयसोलेटेड व्यवहार पद्धतशीरपणे व नियमितपणे "स्थापित एजन्सी" असलेल्या, ज्यांना माल निवड करणेचे विशेष कौशल्य आणि क्षमता आहे तिचे मार्फत केलेले असतील, तर भारतीय प्राप्तिकर कायद्याचे कलम ४२[३] खाली त्यांना "व्यापारी व्यवहार" म्हणू शकतो आणि त्यामधून निर्माण झालेल्या नफ्याचा भागावरील प्राप्तीकराची आकारणी हि भारतात खरेदीचे झालेल्या व्यवहार अंतर्गत भारतीय प्राप्तिकर कायदा कलम ४२[१] व ४२[3] केली जाऊ शकते.

बंगळुरू वूलन, कॉटन अँड सिल्क मिल्स कंपनी लिमिटेड विरुध्द आयकर आयुक्त, मद्रास [१९५०] (१८ आय. टी. आर.४२३), आयकर आयुक्त, मुंबई विरूद्ध अहमदभाई उमरभाई अँड कंपनी ([१९५०] एस. सी. आर. ३३५), कर आकारणी आयुक्त विरुद्ध किर्क ([१९००] ए. सी. ५८८), रॉजर्स पायट शेलॅक कंपनी

विरुद्ध भारताचे राज्य सचिव ([१९२५] आय. एल. आर. ५२ कलकत्ता १) आणि वेब सन्स अँड कंपनी विरुद्ध प्राप्तिकर आयुक्त, पूर्व पंजाब (१९५०] १८ आय. टी. आर.३३) न्यायनिर्णयांचे आधार घेतले गेले .

भारतातील अनिवासी आणि निवासी व्यक्ती यांच्यातील झालेले जे "आयसोलेटेड" व्यवहार, ज्यामध्ये कोणतेही व्यापारी व्यवहार झालेले नसतात, ज्यांना व्यापारी सबंध म्हणता येत नसलेमुळे अश्या व्यवहारांना कलम ४२ च्या तरतुदी लागू होत नाहीत, परंतु ज्या व्यवहारांमध्ये सातत्याचे व्यावसायिक नाते असून त्यापैकी एकजण हे भारतातील व्यक्ती असते जी नफा कमावण्यास मदत करणारी असते आणि दुसरी भारताबाहेरील व्यक्ती असते जी तो नफा मिळविते किंवा वसूल करते, त्यावेळी तशी नाती व्यावसायिक सबंध निर्माण करतात.

दिवाणी अपील न्यायाधिकरणः मद्रास येथील उच्च न्यायालयाचा दिवाणी अपील क्रमांक २७/१९४७, दिनांक १८ जानेवारी १९५० मधील (न्यायमूर्तीगण सत्यनारायणा राव आणि विश्वनाथ शास्त्री) यांचा निकाल व आदेश यावरील दिवाणी अपील क्रमांक १२ /१९५२.

<u>वकील</u>:

अपीलकर्त्यासाठी : ओ. टी. जी. नांबियार (त्यांच्यासोबत एस. एन. मुखर्जी).

उत्तरवादी साठी : भारताचे महाधिवक्ता एम. सी. सीतलवाड आणि

भारताचे सॉलिसिटर जनरल सी. के. दाफ्टरी

(त्यांच्यासोबत जी. एन. जोशी आणि पी. ए. मेहता)

(दिनांक २२ डिसेंबर १९५२ रोजी न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती महाजन यांनी पारीत केला.)

भारतीय प्राप्तिकर कायद्याच्या कलम ६६[१]) अंतर्गत प्राप्तिकर कायदा अपिलीय न्यायाधिकरणाने दाखल केलेल्या संदर्भ अर्जा मधील दोन मुद्धे, ज्यावर मद्रास येथील उच्च न्यायालयाने दिनांक १८ जानेवारी १९५० रोजी दिलेल्या निकाला विरुद्ध चे हे अपील असून ज्याध्ये सदर उच्च न्यायालयाने ते दोन मुद्धे होकारार्थी उत्तर देऊन निकाली काढलेले होते.

अपीलकर्ता ही युनायटेड किंगडममध्ये नोंदणीकृत असलेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे आणि त्यांच्या मालकीची फ्रेंच भारतातील पाँडिचेरी येथे एक कताई आणि विणकाम गिरणी आहे.अपीलकर्त्याचे लेखावर्ष हे दिनदर्शिका वर्ष असते. १९३९ साली कंपनीने उत्पादन केलेल्या सूत किंवा कापडाची विक्री ब्रिटिश इंडिया मधे केली नव्हती, जशी त्यामागील आर्थिक वर्षात झालेली

होती. ब्रिटिश इंडिया च्या कालावधीत सदर गिरणीसाठी लागणार असलेल्या कापसाची सर्व खरेदी मेसर्स बेस्ट अँड कंपनी लिमिटेड यांनी केलेली होती. अपीलकर्ता व मेसर्स बेस्ट अँड कंपनी लिमिटेड यांचेमध्ये झालेला दिनांक ११ जुलै १९३९ करारानुसार मेसर्स बेस्ट अँड कंपनी लिमिटेड हे अपीलकर्ता यांचे ब्रिटिश इंडिया मधील व्यवसायाचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त केलेले होते. मेसर्स बेस्ट अँड कंपनी लिमिटेड याना सदर करारामधील अटींनुसार अपीलकर्ता यांचे व्यवसाया संबंधीत त्यांच्या तर्फे माल खरेदी करणे व बिले, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट व पावत्यांवर सह्या करणे, तसेच अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अगर त्यांच्यावर दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये वाटाघाटी करणे, मिटवणे अगर तडजोड करणेचे पूर्ण अधिकार आहेत. सदर प्रतिनिधींना अपीलकर्त्या तर्फे पैसे उधार घेण्याचा आणि आगाऊ रक्कम देण्याचा अधिकार आहेत . अपीलकर्त्याच्या व्यवसायाच्या संदर्भात आणि त्याच्याशी संबंधित सर्वोत्तम दलाली, सवलती , सूट आणि इतर भत्ते मिळवणे बाबत त्यांनी लक्ष असणे देखील अपेक्षित होते. त्यांना अपीलकर्त्याचे हिशेब योग्य ठेवण्याचे आणि त्याच्या जमा रक्कम अपीलकर्त्या कडे जमा करणेचे सुद्धा स्वातंत्र्य आहे. त्यांना दरमहा रु. ६,५००/- पगार आणि झालेल्या नफ्यामध्ये टक्केवारीने दलाली दिली जात असते. संबंधित आर्थिक वर्षात पाँडिचेरी येथील गिरणीसाठी आवश्यक असलेली कापसाची सर्व खरेदी ब्रिटिश भारतातील अपीलकर्ता यांच्या सदर प्रतिनिधींनीच/ एजंट्सनी केली होती आणि त्यांचे शिवाय इतर कोणीही प्रतिनिधी यांचेकडून केली गेली नव्हती. सदर प्रतिनिधी यांनी निर्णय आणि कौशल्याचा वापर केला आणि चांगली गुणवत्ता असलेला व योग्य प्रमाणात लागेल तेवढा कापूस त्यांच्या अनुभविक मताने कंपनी साठी हितकारक ठरेल अश्या योग्य दराने खरेदी केलेला होता.

१९३९--४० पूर्वी अपीलकर्त्याने उत्पादित केलेल्या वस्तूंच्या ब्रिटिश इंडिया मधे

केलेल्या विक्रीतून झालेल्या नफ्याच्या उलाढालीच्या आधारावर त्यांच्या प्राप्तिकराची आकारणी केली गेली होती. अपीलकर्ता यांनी असे सांगितले आहे कि, कर आकारणी वर्ष १९३९-४० दरम्यान दिनांक १ एप्रिल १९३९ पासून त्यांनी आपला ब्रिटीश भारतातील व्यवसाय बंद केला आणि कलम २५[३] अंतर्गत करमाफी ची मागणी केली होती जी मान्य करण्यात आली होती. त्यांनी केलेल्या चौकशीत असे समजले होते कि प्राप्तिकर अधिकाऱ्याला असे आढळले माल की जरी अपीलकर्ता ब्रिटिश इंडिया मध्ये माल विक्री करत नव्हता व त्यामधून नफा मिळवत नव्हता, परंतु त्यांनी ब्रिटिश इंडिया मध्ये त्यांच्या गिरण्यांसाठी लागणारा माल व वस्तू यांची खरेदी करण्याचा व्यवसाय प्रत्यक्षपणे चालू ठेवलेला होता. त्यानंतर प्राप्तीकर अधिकाऱ्यांनी असे निर्णीत केले की, ब्रिटिश भारतातील कापसाची अशी खरेदी हि ब्रिटिश इंडियात केलेला व्यवसाय होतो आणि त्यामुळे त्या खरेदी मधून झालेला नफा हा नफा सदर कायद्याच्या कलम ४२[२] व [४२[३] अंतर्गत करपात्र होता. त्यामुळे सदर कंपनीस त्या व्यवसायामधून झालेला निव्वळ नफा रुपये २,८१,१७६/- धरला गेला व त्यावर कलम ४२[३] खाली त्यावर १०% प्राप्तिकर कर हा ब्रिटीश भारतात केलेल्या सदर व्यवसायामधून झालेला व्यावसायिक ''नफा व फायदा' यावर आकारला आलेला आहे. अपीलकर्ता याने प्राप्तिकर अधिकारी याच्या त्या आदेशाविरुद्ध अपिलीय सहाय्यक आयुक्तां कडे अपील केले होते, परंतु त्यांनी प्राप्तीकर अधिकारी यांचा आदेश कायम ठेवला.त्यावर अपीलकर्त्याने अपिलीय न्यायाधिकरणाकडे केलेली आणखी एक याचिका अयशस्वी ठरली.

अपीलकर्त्याने सांगितले प्रमाणे अपिलीय न्यायाधिकरणाने सदर प्रकरणाचे स्वरूप नमूद केले आणि सदर कायद्याच्या कलम६६[१] अंतर्गत खालील प्रश्न विचारार्थ काढून ते उच्च

न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठवलेः

"१. या प्रकरणातील परिस्थितीत सदर कंपनी ने आयकर कायद्याच्या कलम ४२[१] व ४२[३] तरतुदीच्या अर्थानुसार ब्रिटिश भारतात काही व्यावसायिक उलाढाल केलेली होती काय?

२.प्राप्तिकर कायद्याच्या कलम ४२[१] व ४२[३] च्यानुसार सदर कपंनीचे सचिव व प्रतिनिधी यांनी ब्रिटिश इंडिया मध्ये केलेली कापूस खरेदी मधून झालेला नफा हा सदर करआकारणीस पात्र धरता येतो काय ?

उच्च न्यायालयाने वरील दोन्ही प्रश्नांची उत्तरे होकारार्थी दिलेली आहेत आणि ती आमच्या मते बरोबर दिलेली आहेत.

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने उच्च न्यायालयात केलेल्या युक्तिवादांचा आमच्यासमोर पुनरुच्चार केला आणि असा युक्तिवाद केला की या खटल्याच्या तथ्यांवर असे निष्कर्ष काढण्यास वाव नाही की कर आकारणी पात्र व्यक्तीस भारतात केलेल्या व्यवसायापासून प्रत्यक्षपणे अगर अप्रत्यक्षपणे प्राप्त झालेला कोणताही नफा करपात्र ठरतो . असाही युक्तिवाद करण्यात आला होता की ब्रिटीश भारतात फक्त कच्च्या माल व वस्तूंच्या खरेदीमुळे परिणामी नफा जमा झाल्याचा किंवा उत्पन्न मिळाले आहे असे होत नाही आणि वस्तूंच्या विक्रीवरील नफा ज्या ठिकाणी वस्तूंची विक्री केली जाते त्याच ठिकाणी सदर विक्रीमधून नफा झाला असे होते आणि या प्रकरणामध्ये ब्रिटीश भारतात कोणतीही विक्री झालेली नसलेने, ब्रिटीश भारतात सदर आर्थिक वर्ष

१९३९ मध्ये सदर कंपनीला कोणताही नफा झाला नव्हता, किंवा झाला नाही किंवा ब्रिटीश भारतात कोणताही नफा झाला होता असे मानले जाऊ शकत नाही. त्याच्या सदर युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी अनेक न्यायनिर्णयांचे दाखले सादर केले ; त्यापैकी त्यांनी, महसूल मंडळ विरुद्ध मद्रास एक्सपोर्ट कम्पनी (१), जीवन दास विरुद्ध प्राप्तिकर आयुक्त, लाहोर (२), रहीम विरुद्ध प्राप्तिकर आयुक्त (३), प्राप्तिकर आयुक्त, मुंबई विरुद्ध वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स कम्पनी (४), प्राप्तिकर आयुक्त विरुद्ध लिट्ल्स ओरिएंटल बाम लिमिटेड (५) या प्रकरणांवर भर दिला. यापैकी बहुतेक न्यायनिर्णय हे १९२२ च्या कायद्यांतर्गत व त्यामध्ये १९३९ च्या दुरुस्ती कायद्याद्वारे कलम ४२[३] अंतर्भूत करणेपूर्वी दिलेले आहेत. **[(१) (1923) आय . एल. आर. 46 मद्रास 360, (२) (१९२९) आय. एल. आर. १० लाहोर ६५७, (३) ए. आय. आर. १९४९ ओरिसा ६०, (४) ए. आय. आर. १९४६ बॉम्बे १८५,**

(५)[१९५०] १८ आय. टी. आर. ८४९]

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने आधार घेतलेल्या न्यायनिर्णया व्यतिरिक्त जे इतर न्यायनिर्णय आमच्यासमोर सादर केले आहेत त्यामध्ये असा आधार घेतला आहे कि कच्च्या मालाची खरेदी देखील व्यवसायाच्या संबंधित प्रक्रियेचाच भाग असतो आणि जर ती ब्रिटीश भारतात केली गेली असेल तर अशा व्यव्हारमधून जो नफा होत असेल तो नफा हा आयकर कायद्याच्या कलम ४२ अंतर्गत करपात्र ठरू शकतो.

रॉजर्स पायट शेलॅक कंपनी विरुद्ध सचिव, भारत राज्य (६) **[(१९२५) आय. एल. आर.५२ कलकत्ता]**, या प्रकरणामधील निकाल हा या मुद्द्यावरचा एक अग्रगण्य न्यायनिर्णय आहे. त्या

प्रकरणाचा निर्णय हा भारतीय प्राप्तीकर कायदा,१९१८ चे कलम ३३ अंतर्गत घेण्यात आला होता आणि त्यामधील निकालपत्रात असे दिसून आले आहे की या प्रकरणात पालन केलेले तत्त्व हे समान होते ज्याला नंतर प्राप्तीकर कायदा, १९२२ चे कलम ४२[३] अन्वये मूर्त स्वरूप देणेत आले. त्या प्रकरणात उच्च न्यायालयाला पाठवलेला प्रश्न हा खालील स्वरूपात होता:-

> **" या कंपनीने अमेरिकेतील खुल्या बाजारात विक्री करणेसाठी भारतात खरेदी केलेला शेलॅक आणि अभ्रक, १९१८ चा ७ वा प्राप्तीकर कायदा किंवा १९२२ चा ११ वा कायदा आणि १९१७ चा ८ वा अतिरिक्त कर कायद्यांतर्गत सदर कंपनी प्राप्तीकर आणि सुपर टॅक्स चे आकारणीस पात्र होते काय ?**

आणि वरील प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देण्यात आले होते.त्या निकालातील जी कारणे दिलेली होती तीच कारणे स्वीकारत रंगून उच्च न्यायालयाने आयकर आयुक्त, बर्मा विरुद्ध स्टील ब्रदर्स[१] या खटल्यात दिली होती.

यासारख्याच मुद्धा असलेल्या अलीकडची प्रकरणे जी प्राप्तिकर कायद्याच्या कलम ४२ अंतर्गत निकाली झालेली आहेत त्यांचा उल्लेख येथे करणे शक्य होते, त्यापैकी मोटर युनियन इन्शुरेन्स कंपनी विरुद्ध कमिशनर ऑफ इनकम टॅक्स बॉम्बे [२] आणि वेब सन्स अँड कंपनी विरुद्ध प्राप्तिकर आयुक्त, पूर्व पंजाब (३) हि आहेत .**[(१) (१९२६) आय. एल. आर. ३ रंगून ६१४, (२) ए. आय. आर. १९४५ बॉम्बे २८५, (३) [१९५०]१८ आय. टी. आर. ३३]** शेवटच्या प्रकरणात, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेत नोंदणीकृत असलेली करपात्र कंपनी होती जी अमेरिकेत गालिचे बनवण्याचा व्यवसाय करत होती, जी त्यांच्या प्रतिनिधींमार्फत ब्रिटिश भारतामधे त्यांच्या गालिचे तयार

करण्याच्या व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल -लोकर ब्रिटिश इंडिया मधून खरेदी करणे हा एकमेव व्यवसाय करत होती. त्यामध्ये असा निष्कर्ष काढला गेला कि सदर "खरेदी करणे " हा कलम ४२[३] च्या अंतर्गत व्यवसायाचा भाग होतो आणि अशा खरेदीतून मिळणारा नफा ब्रिटिश भारतात मिळविला आहे असे मानले जाऊ शकते आणि त्यांचे परिणामी त्या खरेदी मधून झालेला नफा हा भारतीय आयकर कायद्याच्या कलम ४२[३] अंतर्गत कर आकारणीस पात्र ठरतो. या प्रकरणात उच्च न्यायालयाकडे पाठवलेले प्रश्न आणि या चौकशीशी संबंधित असलेले प्रश्न खालीलप्रमाणे होते:-

" (१) केवळ कच्च्या मालाची खरेदी करणे हे कायद्याच्या कलम ४२[३] च्या अंतर्गत "कार्य"[an operation] ठरते काय ?

(२) केवळ कच्च्या मालाच्या खरेदीतून काही नफा होऊ शकतो का?"

या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे देताना असे नमूद गेले आहे कि:-

" हे स्पष्ट आहे की उत्पादकांच्या संस्थेद्वारे कच्च्या मालाची खरेदी करणे ही एक व्यावसायिक प्रक्रिया किंवा कार्यपद्धती आहे जी त्यापासून उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या विक्री पासून मिळणाऱ्या अंतिम नफ्यात प्रशंसनीय प्रमाणात योगदान देते."

अशा प्रकारे फक्त खरेदीच्या कामा मधून कोणताही नफा होत नाही या प्रश्नावर न्यायालयीन मतामध्ये एकमत दिसून येत नाही.

आमच्या मते , अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाचा युक्तिवाद, आणि ज्यावर त्याचा संपूर्ण सम्पूर्ण युक्तिवाद आधारित आहे, कि फक्त विक्री मधूनच नफा होतो किंवा उत्पन्न होतो, हा मान्य होऊ शकत नाही आणि तो युक्तिवाद कमिश्नर ऑफ इनकम टॅक्स विरुद्ध अहमदभाई उमेरभाई अँड कंपनी[१] मधील न्यायतत्वांअनुसार नाकारला जायला हवा. सदर खटला हा १९४० चा १५ वा एक्ससेस प्रॉफिट टॅक्स ऍक्ट, या खाली दाखल झालेला होता. ब्रिटीश भारतात रहिवासी असलेल्या व ब्रिटीश भारतात भुईमूग तेलाचे उत्पादन आणि विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या आणि ब्रिटीश भारतात तसेच हैद्राबाद राज्यामधील रायचूर येथे त्यांच्या मालकीच्या असलेल्या काही तेल गिरण्या होत्या, जिथे तेलाचे उत्पादन केले जायचे. रायचूर येथे उत्पादित केलेले काही तेल हैद्राबाद राज्यात व काही तेल मुंबईत विक्री केले जायचे. न्यायालयाने त्या न्यायनिर्णयात असा निष्कर्ष काढलेला होता कि रायचूर येथे उत्पादित झालेल्या सदर तेलाची विक्री जरी मुबंईमध्ये झालेली असेल व त्याची किंमत जरी मुंबईत मिळाली असेल, 'तरी त्या व्यवसाया पासून तेवढ्या तेलविक्रीच्या भागाचा नफा, हा रायचूर येथेच उदभवला व निर्माण झाला आहे आणि आणि त्यानुसार, रायचूर मधे उत्पादित झालेले जेवढे तेलाची मुंबईत विक्री झाली व त्यापासून मिळालेल्या नफ्याचा जो भाग आहे तो सदर कायद्याच्या कलम ५ च्या परंतुक अन्वये तो 'अतिरिक्त नफा कर' म्हणून सूट मिळणेस पात्र होतो. या प्रकरणात संदर्भ अर्ज प्रकरण - " करआयुक्त विरुद्ध किर्क" (२) मधील हाउस ऑफ लॉर्ड्स यांचे न्यायनिर्णयाचा दाखला देणेत आला आहे , ज्यामध्ये असे निर्णीत करणेत आले होते कि उत्पनाचा काही भाग हा न्यू साउथ वेल्स कॉलनीच्या मातीतून जो धातू काढला गेला आहे त्यापैकी आहे आणि नंतरच्या दुसऱ्या वसाहतीमध्ये काही कच्च्या धातूचे व्यापारी उत्पादनात रुपांतर केल्यामुळे जे उत्पन्न आहे, ते जरी तयार झालेला उत्पादित माल हा सदर

वसाहतीच्या बाहेर विक्री झाला असेल तरी , सदर उत्पन्न, न्यू साउथ वेल्स लँड अँड इन्कम टॅक्स असेसमेंट ऍक्ट १८९५ चे कलम १५,पोटकलम ३ व ४ खाली करआकारणीस पात्र होते . लॉर्ड डेव्ही यांनी प्रिवी कौन्सिलच्या सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदवलेली आहेत:-

" त्या लॉर्डशिप्स यांना असे दिसले होते सदर 'उत्पन्न मिळवणे अगर निर्माण करणे', मध्ये तीन प्रक्रिया आहेत- (१) जमिनीतून धातू काढणे; (२) कच्च्या धातूचे व्यापारी वस्तू मध्ये रूपान्तर करणे, जी एक उत्पादन प्रक्रिया आहे; (३)उत्पादित व्यापारी वस्तूची विक्री करणे ; (४) विक्रीतून निर्माण झालेले पैसे. या सर्व प्रक्रिया या आवश्यक टप्पे आहेत जे पैशात रूपांतरित होतात आणि त्यापासूनचे मिळणारे "उत्पन्न' म्हणजे जे विक्रीपासून पैसे मिळाले आहेत, ते वजा या चार प्रक्रियांच्या दरम्यान झालेला खर्च. लॉर्डशिप्स यांच्या मते पहिली प्रक्रिया हि पोट -कलम ३ मध्ये मोडते , आणि दुसरी प्रक्रिया म्हणजे "उत्पादन करणेची प्रक्रिया", पण जर ती पोट-कलम ३ मध्ये नमूद असलेल्या तरतुदी मधील अर्थाने "व्यापार" होत नसेल , तर नक्कीच ती पोट -कलम ४ मधील संज्ञा- " इतर कोणत्याही प्रकारचे स्रोत ', यामध्ये समाविष्ट होते.”

सबब वरील दोन प्रक्रिया संबंधित लॉर्डशिप्स यांना असे वाटले कि त्या प्रकरणामधील " उत्पन्न " हे न्यू साउथ वेल्समध्ये मिळवले आणि निर्माण झाले व उद्भवले होते .

समतेचे तत्वानुसार कारणमीमांसा करताना या प्रकरणात असे म्हणणे योग्य होईल कि अपीलकर्ता यांना जो फायदा जमा किंवा उद्भवला आहे तो तीन व्यावसायिक प्रक्रिया किंवा कामे

या पासूनचा आहे: (१) ब्रिटिश भारतात कापसाची खरेदी करणे;(२) त्यांचे पाँडिचेरीमध्ये उत्पादन प्रक्रियेद्वारे सूत किंवा कापडात रूपांतर करणे ; आणि (३) सदर उत्पादित व्यापारी वस्तूची विक्री करणे, आणि ते या तीन प्रक्रियांच्या मध्ये विभागले जायला हवे. मद्रास उच्च न्यायालयाने "बंगळुरू वूलन, कॉटन अँड सिल्क मिल्स कंपनी लिमिटेड विरुद्ध आयकर आयुक्त , मद्रास" [१] **[(१९५०) १८ आय टी . आर. ४२३]**: त्या प्रकरणामध्ये असे निर्णीत केले होते कि ब्रिटिश भारतामध्ये व्यवस्थापकीय प्रतिनिधींकडून कच्चा मालाची खरेदी करणे हे काम कलम ४२[३] च्या तरतुदीनुसार आहे आणि हे कि त्याच्या काही भागाचा सबंध ब्रिटिश भारतात केले गेलेल्या खरेदीशी आहे.

या विषयावरील निकाली झालेल्या खटल्यांचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर आणि १९३९ च्या दुरुस्ती कायद्या ने १९२२ च्या कायद्यात अंतर्भूत केलेले कलम ४२[३] मधील तरतुदीच्या अनुषंगाने विचार करता, आम्ही या निष्कर्षावर पोहचलो आहोत कि कायद्याच्या सध्याच्या स्थितीत अपीलकर्त्याच्या विद्वान वकिल याने जो दृष्टिकोन मांडला आहे त्यावर दुजोरा देणेस वाव नाही आणि म्हणून आम्ही उच्च न्यायालयाने जो दृष्टिकोन खोडुन काढला आहे त्याच्याशि सहमत आहोत. या प्रकरणात उच्च न्यायालयाने घेतलेला निष्कर्ष कायम करत असताना आमची अशी इच्छा आहे कि हे नमूद करावे कि, असं नाही कि उत्पादकाच्या व्यापारामधील प्रत्येक कार्य जे " उपक्रम [operation]" या मध्ये मोडत आहे म्हणून त्याला कलम ४२[३] मधील तरतुदी लागू होतात. जोपर्यंत ज्ञात व मान्य झालेल्या व्यावसायिक समजुती व स्वीकारलेल्या पद्धती नुसार हे स्वीकारले गेलेले नाही कि एखादे व्यावसायिक काम हे एक "परिभाषित व्यावसायिक कार्य" आहे , तोपर्यंत या तरतुदीं लागू होत नाहीत.

जोपर्यंत कोणतीही व्यावसायिक कामे परिभाषित केलीली नाहीत किंवा सहज प्रकारची आहेत किंवा वेगळ्या प्रकारची आहेत, ती कामे सामान्यतः या नियमाच्या व्याप्तीत बसणार नाहीत. व्यवसायातील उपक्रम किंवा व्यवहार यामधून झालेल्या नफ्याचे वितरण हे पुरेशा व ठाम कारणास्तवच केले जायला हवे आणि या ठिकाणी ही जी निरीक्षणे नोंदवली जात आहेत ती फक्त या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती पुरतीच मर्यादित आहेत. कदाचित असे जरी मानले कि हे ज्ञात आहे कि कच्च्या मालाच्या खरेदीचे काही व्यवहार ब्रिटीश भारतात झाले आहेत, तरी त्यामुळे सामान्यतः असे म्हटले जाऊ शकत नाही की सदर कृत्ये हि व्यावसायिक उपक्रमाच्या स्वरूपाची असून "ऑपरेशन्स" या संज्ञेच्या अंतर्गत येतात. या प्रकरणात कच्चा माल खरेदी करणेसाठी तो कच्चा माल निवडणेचे विशेष कौशल्य व क्षमता असलेल्या स्थापित एजन्सीद्वारे पद्धतशीरपणे आणि सवयीनुसार खरेदी केला जात असे व त्यासाठी खरेदीची वेळ व ठिकाण ठरले जात असे. अशा प्रकारच्या कृती सदर कायद्याच्या कलम ४२[३] मध्ये वापरल्या गेलेल्या 'ऑपरेशन' या शब्दाच्या अंतर्गत येत आहेत असे आम्हाला वाटते. सदर कच्चा माल खरेदीचे काम हे स्वतंत्र एकमेव कृती नाही. त्यामुळे सदर मुल्यांकनकर्ता याचा पहिला युक्तिवाद नाकारला जात आहे .

ब्रिटिश भारतात मूल्यांकनकर्त्याचा कोणताही व्यावसायिक संबंध नाही, असा युक्तिवाद त्याचे विद्वान वकिलाने अर्धवट मानसिकतेत केला. या युक्तिवादावर गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता नाही. ब्रिटीश भारतातील अनिवासी आणि निवासी व्यक्ती यांच्यातील कोणत्याही असा एकमेव [isolated]व्यवहार, ज्यामध्ये कोणत्याही व्यावसायिक कामे झालेली नाहीत, ज्यांना व्यापारी सबंध म्हणता येत नाही अश्याना कलम ४२ च्या तरतुदी लागू होत नाहीत,

परंतु ज्यावेळी व्यावसायिक संबंधाचे सातत्य हे जेव्हा ब्रिटीश भारतातील व्यक्ती नफा कमावण्यास मदत करणारी असते आणि तो नफा मिळविणारी किंवा वसूल करणारी व्यक्ती हि ब्रिटीश भारताबाहेरील व्यक्ती असते , त्यावेळी तसे संबंध व्यावसायिक संबंध निर्माण करतात . या प्रकरणात परदेशात माल उत्पादन करण्यासाठी लागणारा संपूर्ण कच्चा माल खरेदी करणारी ब्रिटीश भारतातील एक नेहमीची agency होती आणि सदर एजंटची निवड हि त्याचे कौशल्य, प्रतिष्ठा आणि व्यापारातील अनुभव यामुळे केली गेली होती. या निकालपत्राच्या अगोदरच्या भागात सदर agency कराराच्या ज्या अटी नमूद केलेल्या आहेत त्या हे पूर्णपणे सिद्ध करतात कि मेसर्स.बेस्ट अँड कंपनी लिमिटेड हि जी काही कामे करत होती ती कामे हि परदेशी कंपनी च्या भारतामध्ये असणाऱ्या agency चे व्यवस्थापन करणे अश्या स्वरूपाच्या व्यवसायासारखी होती आणि त्या नंतरच्या संस्थेचा त्या agency सोबत नक्कीच सबंध होता. म्हणून आम्ही विद्वान वकिलाच्या या वाद मुद्ध्याला देखील नाकारत आहोत.

वर दिलेल्या कारणमिंमासेस्तव आम्ही उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनाचे समर्थन करतो आणि अपील खर्चासह फेटाळतो.

याचिका फेटाळण्यात आली.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही

कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x